# बृहन्मुंबई महानगरपालिका

सहा. आयुक्त (अ.नि.) शहर, एफ/दक्षिण विभाग कार्यालय, रूम नं. 44, 3 रा मजला, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, परळ, मुंबई - 12.
email id-ac.recity@mcgm.gov.in
Fax No.24145028, Tel.No.24161614

क्र. सआ/अनि/शहर/ओडी/102 दि.26.06.2019

विषय – बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 अन्वये सार्वजनिक वाहनतळा नजिकचे रस्ते व महानगरपालिकेच्या रस्त्यांवर अनधिकृतरित्या वाहने उभी करून तात्पुरत्या स्वरूपात उभ्या केलेल्या अतिक्रमित वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्याबाबत.

रस्त्यावर व पदपथावर अनधिकृतरित्या उभ्या केलेल्या वाहनांमुळे रस्ता व पदपथावरील नागरीक / पादचारी यांना होणारा त्रास टाळण्यासाठी नियमबाह्यरित्या उभ्या केलेल्या गाडयांवर वाढीव दंडात्मक कारवाई करून सदर वाहन मालक / चालक यांना शिस्त लावण्याच्या दृष्टीने टोचन आकार, दंड, विलंब आकार इ. मध्ये वाढ करण्याची बाब विचाराधिन होती. त्यानुसार दि. 25.06.2019 रोजी मा. मनपा आयुक्त यांनी मान्यता दिली असून सदरचे परिपत्रकाची प्रत सोबत पाठविण्यात येत आहे. सदर परिपत्रकामध्ये नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सोबत – वरील प्रमाणे.

सहा.आयुक्त (अ.नि.) शहर(प्र)

सहा.आयुक्त (अ.नि.) पू.उ./प.उ.

**सहाय्यक आयुक्त विभाग**

**उप आयुक्त/सह आयुक्त (परि - 1, 2, 3, 4, 5, 6, 7)**

**प्रमुख अभियंता (रस्ते)**

प-२U

# बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र. सआ/अनि/शहर/ओडी/94 दि.21.06.2019

## परिपत्रक

विषय – बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 अन्वये सार्वजनिक वाहनस्थळानजिकचे रस्ते व महानगरपालिकेच्या महत्वाच्या रस्त्यांवर अनधिकृतरित्या वाहने उभी करून तात्पुरत्या स्वरूपात उभ्या केलेल्या अतिक्रमित वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्याबाबत.

संदर्भ - 1) मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 कलम 313, 313A, 314, 490
2) परिपत्रक क्र.सआ/अनि/शहर/4821/ दि.21.03.2017
3) परिपत्रक क्र.सआ/अनि/शहर दि.20.11.2017
4) माटूंगा वाहतूक पोलीस विभाग यांचे पत्र क्र.335/प्रपोनि/मावावि/19 दि.19.02.19
5) माटूंगा वाहतूक पोलीस विभाग यांचे पत्र क्र.351/प्रपोनि/मावावि/19 दि.21.02.19

रस्त्यावर व पदपथावर अनधिकृतरित्या उभ्या केलेल्या वाहनांमुळे रस्ता व पदपथावरील जागा मोठया प्रमाणात व्याप्त होते व सुलभरित्या वाहतूकीस अडथळा निर्माण होऊन अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच महानगरपालिकेची स्वच्छताविषयक कामे, इतर विकासात्मक / सार्वजनिक कामे करताना मोठया प्रमाणात अडथळा निर्माण होतो. उपरोक्त संदर्भ क्र.4 व 5 नुसार वाहतूक पोलीसांनी रस्त्याच्या दोन्ही बाजूस वाहनांचीं पार्किंग होत असल्याबाबत अवगत केले आहे. वाहतूक पोलीस विभागाकडून बृहन्मुंबई महापालिकेस अशा प्रकारचा पत्रव्यवहार सतत होत असतो. रस्त्यावरील वाहनांची वाहतूक सुरळीत करण्याकामी उग्र समस्या निर्माण होतात व त्याबाबत वारंवार तक्रारी प्राप्त होतात.

मुंबई महापालिका अधिनियमातील उपरोक्त संदर्भिय तरतूदीनुसार नियमबाह्य उभ्या केलेल्या वाहनांवर (**सार्वजनिक वाहनतळाशेजारील रस्ते व इतर रस्त्यांवर**) /अनधिकृतरित्या वाहने उभी करून अतिक्रमण केलेल्या वाहनांवर खालीलप्रमाणे दंडात्मक वसूली (टोचन आकार, दंड, विलंब आकार इ. / किमान व कमाल) करणेकामी संदर्भ क्र.2 नुसार दि.31.03.2017 नुसार व संदर्भ क्र.3 दि.20.11.2017 नुसार दंडात्मक वसुलीबाबत परिपत्रके यापूर्वीच निर्गमित केलेली आहेत. अतिक्रमित वाहनांवर दंडात्मक आकारणी सुधारित करण्यात आलेली असून, ती पुढीलप्रमाणे आकारण्यात यावी.

**दरपत्रक**

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | टोचन आकार रू. | दंड रू. | विलंब आकार दर दिवसासाठी रू. | कमाल विलंब आकार रू. | एकूण किमान आकार रु. | एकूण कमाल आकार रू. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | जड मोटार वाहन (H.M.V.) | 5,000/- | 10,000/- | 275/- | 11,000/- | 15,000/- | 23,250/- |
| 2 | मध्यम मोटार वाहन (M.M.V.) | 3,300/- | 7,700/- | 220/- | 8,800/- | 11,000/- | 17,600/- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | हलके मोटार वाहन (चारचाकी)(L.M.V.) | 2,500/- | 7,500/- | 170/- | 6,800/- | 10,000/- | 15,100/- |
| 4 | तीन चाकी वाहने (ऑटो रिक्शा व साईड कारसह असलेली दुचाकी वाहने) | 1,100/- | 6,900/- | 140/- | 5,600/- | 8,000/- | 12,200/- |
| 5 | दुचाकी वाहने (मोटार सायकल, स्कुटर इ.) | 700/- | 4,300/- | 110/- | 4,400/- | 5,000/- | 8,300/- |

उपरोक्त दर दि. 25.06.2019 पासून लागू करण्यात येत आहेत.

सार्वजनिक वाहनतळाशेजारील रस्ते / पदपथ व इतर रस्त्यांवर / पदपथावर नो-पार्किंग बाबतचे फलक वाहतूक विभागाने प्रदर्शित करावेत. अतिक्रमित वाहने टोचन (कर्षित) करण्यासाठी कंत्राटदार कार्यकारी अभियंता (परिवहन) (घ.क.व्य.) शहर यांच्या सल्ल्याने विभाग कार्यालयाने नियमानुसार नियुक्त करावेत. अतिक्रमित वाहन टोचन (कर्षित) करण्यासाठी पोलीस विभाग व वाहतुक पोलीस विभाग यांचे सहाय्य/मदत घेण्यात यावी. अतिक्रमित वाहनांना विभाग कार्यालयामार्फत नोटीस देऊन / चिटकवून प्रचलित पध्दतीनुसार (S.O.P.) दंडात्मक कारवाई करण्यात यावी. तसेच अतिक्रमण केलेल्या वाहनावर मालकी हक्क दावा करेपर्यंत महापालिकेच्या ताब्यात असलेल्या वाहनांना नियमानुसार विलंब आकार लावला जाईल.

टोचन केलेल्या वाहनातील न सुटलेली वाहने 30 दिवस पूर्ण झाल्यानंतर बेवारस वाहने असल्याचे समजून ती लिलावामध्ये विक्री करण्यात येतील.

सहा.आयुक्त (अ.नि.) शहर | सहा.आयुक्त (पू.उ.)/(प.उ.) | / कायदा अधिकारी | उप आयुक्त (अ.नि.)

अति.आयुक्त (शहर) | अति.आयुक्त (पू.उ.) | महापालिका आयुक्त